**मराठवाडयातील मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये सुसुत्रता येण्यासाठी व यावर अभ्यास करून अहवाल देण्यासाठी / शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : मआसु- २०२३/प्र.क्र.०३ /१६-क**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २९ मे, २०२३

**प्रस्तावना :**

राज्याच्या मराठवाडा विभागात मराठा समाजास कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आल्याने मा.मुख्यमंत्री यांनी सन २०२३ च्या पहिल्या(अर्थसंकल्पीय) अधिवेशनात मराठवाड्यातील मराठा समाजास कुणबी मराठा व मराठा कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यासंदर्भात अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल अशी घोषणा केली.त्यास अनुसरून मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि.१८.०४.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत सुद्धा याकरीता समिती स्थापन करून अहवाल देण्यासाठी / शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

मराठवाडयातील मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये सुसुत्रता येण्यासाठी व यावर अभ्यास करून अहवाल देण्यासाठी / शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे-

| | |
|---|---|
| अपर मुख्य सचिव (महसूल) | अध्यक्ष |
| अपर मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| अपर मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग | सदस्य |
| सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर | सदस्य |
| जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर | सदस्य |
| जिल्हाधिकारी, जालना | सदस्य |
| जिल्हाधिकारी, नांदेड | सदस्य |
| जिल्हाधिकारी, लातूर | सदस्य |
| सह सचिव, महसूल विभाग | सदस्य सचिव |

२. इतर प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांना आवश्यकतेनुसार समितीच्या बैठकींना आमंत्रित करण्यात यावे.

३. **समितीची कार्यकक्षा व कालावधी-** समितीने खालील बाबी तपासून मराठवाडयातील मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये सुसुत्रता येण्यासाठी आपल्या शिफारशी तीन महिन्यात शासनास सादर कराव्यात-

(१) मराठा समाजाच्या महसुली व शैक्षणिक नोंदी

(२) निजाम काळातील संस्थानिकांनी दिलेल्या सनदी

(३) निजाम काळात झालेले करार, राष्ट्रीय दस्ताऐवज व इतर कागदपत्रे

(४) मराठा समाजातील लोकांची वंशावळ

४. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharshatra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०५२९१७१२४१२९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RASIK AMBADAS KHADSE

Digitally signed by RASIK AMBADAS KHADSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=fdc00fa9bc45e4f7281973d193127b8989dfa5df6a7a694b005e562ebd5c840e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A47200A14B42F151489F73F3E47C9E8733991629B2302A3831B945146BE88A80, cn=RASIK AMBADAS KHADSE
Date: 2023.05.29 17:14:23 +05'30'

**(र. अं. खडसे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद
६) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा
७) सर्व विधान सभा सदस्य/ विधान परिषद, सदस्य
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
९) अपर मुख्य सचिव (महसूल) व वन विभाग
१०) अपर मुख्य सचिव,आदिवासी विकास विभाग
११) अपर मुख्य सचिव,इतर मागास बहुजन कल्याण विभाग
१२) प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग
१३) सचिव,सामाजिक न्याय व विधी व न्याय विभाग
१४) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा)
१६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद)

१७) विभागीय आयुक्त,छत्रपती संभाजीनगर
१८) जिल्हाधिकारी,छत्रपती संभाजीनगर/जालना/नांदेड/लातूर
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२०) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
२१) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२२) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२३) निवडनस्ती.